MARATHI

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक [1][**सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य**] घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;

दर्जाची व संधीची **समानता** ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व [2][राष्ट्राची एकता आणि एकात्मता] यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत** आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी **याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

---

१. संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या कलम २ द्वारे "सार्वभौम लोकशाही गणराज्य" या मजकुराऐवजी दाखल केले (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "राष्ट्राची एकता" या मजकुराऐवजी दाखल केले (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

एच ४०६७-४अ